लोकमत

## राज्य शासनाचा विचार : सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्याची चिन्हे

# सीमाभागासाठी चंदगडमध्ये शासकीय महाविद्यालय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र मराठी भाषिक महाविद्यालय अथवा शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याचा विचार राज्य शासनाने केला आहे. हे महाविद्यालय अथवा उपकेंद्र चंदगड तालुक्याचा विचार अभ्यास समितीने केला आहे. त्यासाठी या तालुक्यातील शिनोळी, तुडिये, शिवनगे, आदी गावांतील शासकीय जमिनीची पाहणी करण्याचा निर्णय या समितीने सोमवारी ऑनलाईन बैठकीत घेतला.

## जागेची उपलब्धता, पदनिर्मिती होणार निश्चित

हे महाविद्यालय अथवा उपकेंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने स्थापन केलेल्या समितीचे अध्यक्ष विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर आहेत. उच्च शिक्षण संचालक (पुणे) डॉ. धनराज माने, जिल्हाधिकारी दौलत देसाई, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. दीपक पवार हे सदस्य, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे सदस्य सचिव आहेत. जागेची उपलब्धता, पदनिर्मिती, पायाभूत सुविधा, निधी या घटकांची निश्चिती केली जाणार आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील लोकसंख्या, विद्यार्थी आणि महाविद्यालयांची संख्या आणि राबवायचे शैक्षणिक उपक्रम या संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९ फेब्रुवारीला शिवाजी विद्यापीठात बैठक झाली. त्यात स्वतंत्र मराठी भाषिक महाविद्यालय चालू करण्यासाठी प्रस्ताव सादर करणे आणि या महाविद्यालयासाठी हलकर्णी किंवा गडहिंग्लज येथील पाच एकर शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा झाली. त्याचा आढावा दि. ३० जूनला मंत्री सामंत यांनी बैठकीद्वारे घेतला. त्यात सहासदस्यीय अभ्यास समिती स्थापन करण्यात आली. चंदगड, गडहिंग्लज तालुक्यांमध्ये कोल्हापूर शहरातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्थांच्या, विद्यापीठाच्या इमारतीत अथवा राजाराम महाविद्यालय यांपैकी एका ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात उपकेंद्र कार्यान्वित करण्याबाबतचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्यानंतर सोमवारी अभ्यास समितीची बैठक झाली. त्यात चंदगड तालुक्यातील जागेची पाहणी करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार शिनोळी, तुडिये, शिवनगे, आदी गावांतील जागेची पाहणी करून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाला समितीकडून सादर केला जाणार असल्याचे समितीचे सदस्य सचिव कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 2 Jul 07, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# अंतिम वर्षांच्या परीक्षा होणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कोरोनाची वाढती संख्या लक्षात घेता आणि विद्यार्थी सुरक्षेमुळे राज्य सरकारने विद्यापीठातील पदवीच्या अंतिम परीक्षा रद्द केल्या असतानाच आता केंद्रीय गृह मंत्रालयाने केंद्रीय उच्चशिक्षण सचिवांना विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांना परीक्षा घेण्याची परवानगी एका पत्राद्वारे दिली. पाठोपाठ अंतिम वर्षांच्या परीक्षा सप्टेंबरमध्ये घेण्याचे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिले आहेत.

## केंद्राचे पत्र : 'यूजीसी' नियमानुसार विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांना परीक्षा बंधनकारक; सप्टेंबरमध्ये परीक्षा

केंद्र सरकारने आणि 'यूजीसी'नेही राज्याची कोंडी केल्याने परीक्षा संघर्ष आता पुन्हा उफाळण्याची शक्यता आहे. पान २ वर ▶

लोकमत

# अंतिम वर्षाच्या परीक्षा सप्टेंबरमध्ये होणार!

## यूजीसीचे संस्थांना परीक्षांविषयी सुधारित निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** यूजीसीच्या (विद्यापीठ अनुदान आयोग) परीक्षा व शैक्षणिक कॅलेंडरच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार देशातील विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संस्थांना सप्टेंबरमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

याचप्रमाणे बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ही घेणे अनिवार्य असल्याचे सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. यूजीसीच्या सुधारित मार्गदर्शक सूचनेनंतर केंद्रीय गृहमंत्रालयाकडून ही राज्यांच्या उच्च शिक्षण सचिवांना पत्र लिहून परीक्षा घेण्यास परवानगी दिली आहे.

यूजीसीच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम वषातील अंतिम सत्राच्या विद्यापीठ आणि उच्च शैक्षणिक संस्थांच्या परीक्षा या सप्टेंबरमध्ये घ्यायच्या आहेत. या परीक्षा ऑफलाईन (पेपर/ पेन पद्धतीने ), ऑनलाईन पद्धतीने किंवा संमिश्र पद्धतीने घेतल्या जाऊ शकणार आहेत. काही कारणास्तव सप्टेंबरमधील परीक्षांना विद्यार्थ्यांना उपस्थित राहता आले नाही तर विद्यापीठ किंवा उच्च शैक्षणिक संस्थेकडून योग्य वेळेनुसार पुन्हा एकदा त्या विद्यार्थ्याला परीक्षेची संधी देण्यात यावी जेणेकरुन त्या विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. मात्र ही संधी केवळ २०१९- २० मधील सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी एकदाच उपलब्ध असणार आहे.

### राज्य सरकारच्या निर्णयाकडे लक्ष

राज्यात व्यवसायिक व अव्यासायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय शासन स्तरावरुन जाहीर करण्यात आला आहे. व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा रद्दला शिखर संस्थांची मंजूरी बाकी असताना केंद्रीय गृह मंत्रालयाकडून राज्यांच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांना धाडलेल्या या पत्रामुळे सगळ्यांच्याच भुवया पुन्हा उंचावल्या आहेत.

पुढारी

# यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांची विद्यापीठाला प्रतीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास केंद्रीय गृहमंत्रालयाकडून परवानगी देण्यात आली आहे. मात्र, अद्याप शिवाजी विद्यापीठाकडे याबाबतची अधिकृत माहिती किंवा परिपत्रक आलेले नाही. यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांची प्रतीक्षा असून त्यानुसार विद्यापीठ कार्यवाही करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत घेण्याबाबत गेल्या काही दिवसांपासून संभ्रमाची परिस्थिती अद्यापही कायम आहे. विद्यापीट कार्यक्षेत्रातून विविध अभ्यासक्रमांच्या २०० परीक्षांसाठी सुमारे ७५ हजार विद्यार्थी असणार आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी हिताचा विचार करून राज्य सरकारने परीक्षा देणाऱ्या व न देणाऱ्या विद्यार्थ्यांना संमतीपत्र देण्यास सांगितले आहे. दरम्यान, सोमवारी केंद्रीय गृहमंत्रालयाने विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांना यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार परीक्षा घेण्यास अनुमती दिली आहे. परंतु परीक्षा कशा पद्धतीने घ्यायच्या याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे अद्याप जाहीर केलेली नाहीत. राज्य सरकार यावर काय निर्णय घेते, त्यानंतर विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे समजते.

# चंदगडमध्ये शासकीय महाविद्यालय

## ऑनलाईन बैठकीत निर्णय; तुडिये, शिवनगेतील जागेची होणार पाहणी

कोल्हापूर, ता. ६ : सीमाभागातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेत उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी तेथे शासकीय महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. याबाबत आज शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन बैठक झाली. यासाठी एक स्वतंत्र समिती बनवली असून, त्यामध्ये सहा सदस्य आहेत.

या महाविद्यालयामध्ये मराठी भाषेतील विविध भाषिक अभ्यासक्रम शिकवले जातील. या ठिकाणी महाविद्यालय अथवा शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याचा विचार आहे. तात्पुरत्या स्वरूपात एखाद्या शासकीय इमारतीत हे महाविद्यालय किंवा शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याचा



प्रस्ताव बैठकीत ठेवला. यावर विचार सुरू आहे. त्यानुसार शिनोळी, तुडिये, शिवनगे, आदी गावांतील जागेची पाहणी करून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाला समितीकडून सादर केला जाणार असल्याचे समितीचे सदस्य सचिव कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

### कुलगुरू पदासाठी कुलसचिवांचा अर्ज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनीही अर्ज केल्याचे समजते. वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. ए. एम. गुरव आणि प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांनी अर्ज केले आहेत.

कुलगुरू पदासाठी अधिविभागतून १४ पेक्षा जास्त अर्ज आल्याचे समजते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी अर्ज केला आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या कुलगुरू कोण होणार याबाबतची उत्सुकता अधिक वाढली आहे.

लोकमत

# कुलगुरुपदासाठी कुलसचिवांसह विद्यापीठ परिक्षेत्रातील १४ इच्छुक

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदासाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील १४ जणांनी ऑनलाईन अर्ज केले असून यामध्ये विद्यमान कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचाही समावेश आहे.

या पदासाठी विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या अधिकारी अथवा प्राध्यापकांनी अर्ज करावयाचा असल्यास त्यांना विद्यापीठ प्रशासनाकडून एनओसी (ना हरकत प्रमाणपत्र) घ्यावी लागते. त्यानुसार विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नांदवडेकर, माजी कुलगुरु डॉ. डी. टी.



शिर्के यांच्यासह विविध अभ्यासक्रमांच्या एकूण बारा प्राध्यापकांनी 'एनओसी' घेतली आहे. त्यात वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. ए. एम. गुरव, एस. एस. महाजन, रसायनशास्त्र विभागातील डॉ. एस. एस. चव्हाण, आदींचा समावेश आहे.

त्यांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत. डॉ. नांदवडेकर हे दि. १८ नोव्हेंबर २०१६ पासून कुलसचिव पदावर कार्यरत आहेत.

या पदावर रुजू होण्यापूर्वी ते पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे (एमसीए) संचालक म्हणून कार्यरत होते. ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत संपली आहे. या अर्जाची प्रत (हार्ड कॉपी) जमा करण्याची मुदत शुक्रवार (दि. १०) जुलैपर्यंत आहे. दरम्यान, याबाबत डॉ. नांदवडेकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी 'एनओसी' घेतली असून, ऑनलाईन अर्ज केला असल्याचे सांगितले.

Kolhapur Main
Page No. 8 Jul 07, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# अंतिम वर्षांच्या परीक्षा होणार

(पान १ वरून) केंद्रीय उच्च शिक्षण सचिवांना पाठवलेल्या पत्रात केंद्रीय गृह मंत्रालयाने म्हटले आहे की, विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांना परीक्षा घेण्यास परवानगी देण्यात येत आहे. यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि कार्यप्रणालीनुसार अंतिम वर्षांच्या परीक्षा घेणे बंधनकारक आहे.

केंद्राचे हे पत्र येताच यूजीसीने परीक्षांसाठी सप्टेंबरचा मुहूर्त सांगणाऱ्या सूचना जारी केल्या. देशातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता जुलै परीक्षा घेणे शक्य आहे का? याबाबत विचार करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने हरियाणा केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू आर. सी. कुहाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने सुधारित मार्गदर्शक सूचना दिल्या. या सूचना आयोगाने सोमवारी पार पडलेल्या बैठकीत मंजूर केल्या. या सूचनांनुसार विद्यापीठांना सप्टेंबमध्ये अंतिम वर्षांच्या परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. या परीक्षा विद्यापीठांनी ऑफलाईन, ऑनलाईन किंवा दोन्ही पद्धतींचा अवलंब करून घ्याव्यात, अशी सूचना आयोगाने केली आहे. हे सांगताना समितीने स्पष्ट केले आहे की, प्रत्येक विद्यार्थ्याला समान न्याय मिळावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना भविष्यात जागतिक पातळीवर टिकाव लागावा म्हणून त्यांच्या संपूर्ण कौशल्यांचे मूल्यमापन होणे आवश्यक असल्याचे समितीने यात स्पष्ट केले आहे. आयोगाच्या निर्णयामुळे राज्य सरकारच्या सध्याच्या निर्णयाला धक्का बसला आहे. यामुळे आता सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**एटीकेटीवाल्यांना दिलासा**

ज्या विद्यार्थ्यांना आधीच्या वर्षांत एटीकेटी आहे अशा विद्यार्थ्यांना एटीकेटी सोडविण्यासाठी त्या परीक्षांचेही आयोजन करावे, असे आयोगाच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे राज्यातील लाखो एटीकेटीच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना अंतिम सत्राच्या परीक्षांमध्ये आधीच्या सेमिस्टर्सची सरासरी काढून गुण दिले जाणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना तरीही परीक्षा द्यायची आहे त्यांना परीक्षा देण्याची मुभाही सरकारने दिली आहे. यामुळे अंतिम वर्षांच्या परीक्षा 'ऐच्छिक' असतील, असे सांगत विद्यापीठ अनुदान आयोगाने अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्याच्या सूचना डावलत राज्य शासनाने राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. राज्यातील स्थिती लक्षात घेता परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर मोठ्या संख्येने जमणे योग्य नाही. विद्यार्थी आणि परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेतील सहभागी व्यक्तींना कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीतील चर्चेनुसार परीक्षांबाबत निर्णय घेतला. परीक्षा घ्याव्यात ही भाजपची मागणी आहे. ती सातत्याने केली जात आहे. असे असताना आता केंद्र सरकारने विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांना परीक्षा घेण्याची परवानगी केंद्रीय गृह मंत्रालयाने केंद्रीय उच्चशिक्षण सचिवांना पत्राद्वारे दिली आहे.

## सोने-चांदी भाव

| शहर | सोने १० ग्रॅ. | चांदी १ कि. |
|---|---|---|
| कोल्हापूर | ४९,६०० | ५०,४०० |
| सोलापूर | ४९,८०० | ५०,१०० |
| सांगली | ४८,५०० | ४९,८०० |
| सातारा | ४९,६५० | ५०,००० |

## अंडी, पक्षी भाव

दि. ७ जुलैचा घाऊक अंड्यांचा बिन ट्रे शेकडा भाव असा
मुंबई नेक दर : ३५०/-
मिरज फार्म गेट दर : ---/-
कि. अंडी विक्री ५० रु. डझन
कोल्हापूर जिल्हा अंडी दर : ३७०/-
नंदा ग्रुप, मिरज
घाऊक ब्रॉयलर जिवंत पक्षी दर १०२/-

## चलन विनिमय दर

| युरो | डॉलर | पौंड |
|---|---|---|
| ८४.४१ | ७४.६६ | ९३.२६ |

पुण्य नगरी

# विद्यापीठ परीक्षांसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाची परवानगी

(पान १ वरून) हटवत १ जूनपासून अनलॉकचा पहिला टप्पा सुरू केला; मात्र कोरोनाच्या रुग्णांची संख्या वाढतच चालल्याने शैक्षणिक संस्था बंदच ठेवाव्या लागल्या. यामुळे स्थगित झालेली एकही परीक्षा होऊ शकलेली नाही.

सीबीएसई बोर्डाची जुलै महिन्यात होणारी परीक्षादेखील रद्द करावी लागली. यासोबत नीट, जेईईच्या परीक्षा सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलाव्या लागल्या.

# अंतिम वर्षाची परीक्षा घेण्यास परवानगी

**नवी दिल्ली :** सध्या देशात अनलॉक-२ चा टप्पा सुरू असताना केंद्रीय गृहमंत्रालयाने देशभरातील विद्यापीठ आणि अन्य शैक्षणिक संस्थांना पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याची परवानगी दिली आहे. ही परीक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार घ्यावी लागणार आहे. परीक्षेदरम्यान अनलॉक-२ आणि यूजीसीच्या मार्गदर्शक सूचना पाळाव्या लागणार आहे. कोरोना संसर्गामुळे २५ मार्चपासून देशभरात लॉकडाउन लागू करण्यात आले आणि त्यानुसार देशभरातील विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांनी शेवटच्या वर्षाची परीक्षा स्थगित केली होती. एक जूननंतर सरकारने अनलॉक-१ ची प्रक्रिया सुरू केली आणि टप्प्याटप्प्याने अत्यावश्यक सेवेबरोबरच अन्य दुकानांना परवानगी दिली आहे. कंटेन्मेंट झोन वगळता अन्य ठिकाणी बाजार, दुकाने सुरू झाली आहेत. दरम्यान, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ आणि अन्य शैक्षणिक संस्थांचे कामकाज मात्र बंदच ठेवण्याचा निर्णय कायम आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षांसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाची परवानगी

**नवी दिल्ली :** जुलैपासून सुरू झालेल्या अनलॉकच्या दुसऱ्या टप्प्यात अनेक निर्बंध शिथिल करतानाच, सरकारने विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांना परीक्षा घेण्यास परवानगी दिली आहे. प्रामुख्याने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने सोमवारी एक पत्रक प्रसिद्ध करून याबाबतची माहिती दिली.

शैक्षणिक अभ्यासक्रमांची अंतिम वर्षाची परीक्षा अनिवार्य असेल. विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीच्या दिशानिर्देशांनुसार ही परीक्षा घेण्यात येईल. यासोबतच केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून परीक्षा आयोजित करण्यात यावी, असे मंत्रालयाने स्पष्ट केले. यासंदर्भात उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांना पत्र पाठवण्यात आले आहे. कोरोना महामारीला रोखण्यासाठी मार्च महिन्यात लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे अनेक विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांच्या परीक्षा स्थगित कराव्या लागल्या. मेअखेरीस सरकारने लॉकडाऊनचे निर्बंध ▶▶ पान ७ वर